# जनसंपर्क अधिकारी

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेस नोट ४००-२०२४ दिनांक :- २६/१०/२०२४

## "सोन्याचा कडा चोरी करणाऱ्या महीला आरोपींस अटक करुन मुद्देमाल हस्तगत करण्यात बोळींज पोलीसांना यश."

दिनांक १०/१०/२०२४ रोजी सायंकाळी ०५.३० वाजण्याचे सुमारास प्रकाश ज्वेलर्स नावाचे दुकान, आगाशी रोड, विठ्ठल मंदीराच्या समोर, डिसीबी बँकेच्या बाजुला, विरार पश्चिम, ता.वसई, जि.पालघर येथे फिर्यादी हे त्यांचे ज्वेलर्स दुकानात असतांना बुरखाधारी आरोपीत महीलेने फिर्यादीस व इतर दुकानदारांना काहीएक न सांगता त्यांचे लक्ष नसल्याचा फायदा घेवुन दुकानातील १,७८,०००/- रुपये किंमतीचा एक सोन्याचा पंजाबी जेन्टस कडा २१.७२० ग्रॅम वजनाचा स्वत:चे आर्थिक फायदयाकरीता लबाडीच्या इरादयाने फिर्यादीचे संमती शिवाय चोरी करुन नेला आहे. फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरुन बोळींज पोलीस ठाणेस गु.र.क्र. I ०२/२०२४, भा.न्या.सं.२०२३ चे कलम ३०५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.

बोळींज पोलीस ठाणे हे नवनिर्मीत पोलीस ठाणे असून लोकांचे सुरक्षिततेबाबत व मालमत्तेचे गांभीर्य लक्षात घेवून वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचा तपास सुरु केला. सदर गुन्हयाचे घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज पाहीले असता, तीने पुर्णपणे बुरखा परीधान केला होता. त्यामुळे तीची तात्काळ माहीती मिळणे अशक्य होते. तद्नंतर घटनास्थळावरुन आरोपीत ज्या ठिकाणाहून गेली त्या दिशेचे जवळ जवळ ३० ते ४० सीसीटीव्ही कॅमेरे पाहून सदर महीलेचा चेहरा विरार रेल्वे स्थानकाचे सीसीटीव्ही कॅमे-यात दिसून आला. तीचे वर्णनावरुन आरोपीत महीलेचा मुंबई येथील गुन्हे अभिलेखाची माहीती काढून गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहीतीच्या आधारे गुन्हयातील महिला आरोपी वय ४५ वर्षे, रा धारावी लिंक रोड, धारावी, असल्याचे निष्पन्न केले. आरोपीत महीलेस नमुद गुन्हयात अटक करुन तीचे कडून गुन्हयातील १,७८,०००/- रुपये किंमतीचा एक सोन्याचा पंजाबी जेन्टस कडा २१.७२० ग्रॅम वजनाचा हस्तगत करुन सदरचा गुन्हा उघडकीस आणला आहे.

वर नमूद गून्हयाचा तपास पो.उपनिरी./क्रिष्णा वाघमोडे, बोळींज पोलिस ठाणे, मि.भा.व.वि.पोलीस आयूक्तालय हे करीत आहेत.

सदरची कामगिरी, जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०३, राजेंद्र लगारे, सहा. पो.आयुक्त नालासोपारा यांचे मार्गदर्शनाखाली राजेंद्र तेंडुलकर, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, बोळींज पोलीस ठाणे, प्रकाश सावंत, पोलीस निरीक्षक (गुन्हे), पो.उपनिरी./विष्णू वाघमोडे, पो.उपनिरी./किरण वंजारी, सफौ/९५०२० जनार्दन मते, पोहवा/०३०६२ किशोर धनु, पो.अं./१४०७६ रोशन पुरकर यांनी केलेली आहे.

----oooo------